## ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्रांतील एम्. फिल्. या पदवीसाठी मी "मुस्लिम अल्पसंख्यांकांची सामाजिक अभिवृत्ती हा विषय शोध निबंधासाठी निवडला. हा शोध निबंध सादर करीत असतांना माझे आदरणीय मार्गदर्शक देवचंद महाविद्यालयाचे उप-प्राचार्य व समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. माधव ज. कशाळीकर यांनी केलेले मार्गदर्शन अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहानामुळे व अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळेच प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करता आला. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस्. एन्. पवार व याच विभागातील डॉ. पाटील, डॉ. आंबेकर, प्रा. दहिवले व प्रा. आवटे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा मला लाभ मिळाला. याबद्दल त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर मधील प्रा. एन्. डी. कांबळे, प्रा. जे. डी. कांबळे, प्रा. टी. जी. पवार, प्रा. पी. जी. शहा व इतर सर्व सहकारी प्राध्यापक मित्र, कॉलेजचे ग्रंथपाल व इतर कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचाही मी अतिशय ऋणी आहे.

प्रस्तुत शोध निबंधासाठी इस्लामपूर येथील अनेक मुस्लिम बांधवांनी मला अमोल सहकार्य दिले व मुलाखतीव्दारे आवश्यक तो तपशील पुरविला त्याबद्दल मला त्यांचे आभार मानलेच पाहिजेत.

शोध निबंधाचे टंकलेखन हे अत्यंत किचकट व कठीण काम असते. पण श्री. शंकरराव चव्हाण यांनी अत्यंत काळजीपूर्वक व सुबक टंकलेखन वेळेवर करून दिले त्याबद्दल त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो.

अर्जुननगर.
दिनांक: १५ डिसेंबर, १९८६.

एन्. एस्. काझी.

SHIVAJI UNIV... LIBRARY KOLHAPUR